## संक्षिप्त...

### अजितदादांच्या संकल्पनेतील पक्ष साकार करू : भोपणीकर

तभा वृत्तसेवा

देवणी दि. ११ जून : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांचा २७ वा वर्धापन दिन देवणी शहरात साजरा करण्यात आला . सर्वप्रथम अजित दादा पवार यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.या प्रसंगी माजी आ. धर्माजी सोनकवडे , राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष महेश जाधव आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पंचायत समिती सदस्य गजानन भोपणीकर उपस्थित होते .

कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना गजानन भोपणीकर म्हणाले की ,अजित दादा पवार यांच्या संकल्पनेतील राष्ट्रवादी पक्ष उभा करण्यासाठी आपण सर्वजण कार्य करू तरच अजित दादा पवार यांना श्रद्धांजली वाहिल्यासारखं आहे असे या प्रसंगी भोपणीकर यांनी सांगितले .गेल्या वर्षी अजित दादा पवार यांच्या समवेत आम्ही पुणे येथे राष्ट्रवादीचा वर्धापन दिन सोहळा साजरा केला होता पण आज दादा आपल्यात नाहीत ही खूप मोठी उणीव राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला जाणवत असून ही भरून निघणे शक्यच नाही परंतु अजितदादा पवारांचे ध्येय धोरण उद्दिष्टे राष्ट्रवादी पक्षाविषयी असणारी स्नेह आपुलकी प्रेम हे कर्तव्य म्हणून आपण कार्य करू असे याप्रसंगी सांगितले राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा फुले शाहू आंबेडकरी विचारावर चालणारा व सर्वसामान्याला सोबत घेऊन विकासासाठी कार्य करणारा पक्ष असून त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस मोठ्याने भरारी घेत आहेत अजित दादा पवार यांची उणीव भरून निघणार नाही परंतु सुनेत्रा वहिनी ह्या सक्षमपणे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांची धुरा सांभाळत आहेत त्यामुळे राष्ट्रवादी पक्ष परत एकदा उभारी घेताना दिसतो आहे असे सांगून सर्वसामान्य लोकांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात सहभागी होऊन आम्हाला कार्य करण्यासाठी व सुनेत्राताई अजित पवार यांचे हात बळकट करण्यासाठी राष्ट्रवादी पार्टीत सहभागी होऊन हातभार लावावा असेही सांगितले व तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष महेश जाधव व माजी आमदार धर्माजी सोनकवडे यांचेही यावेळी समयोचित भाषण झाले. याप्रसंगी देवणी नगरपंचायतचे नगरसेवक अमित सूर्यवंशी,उबेद उंटवाले, हिशोब सय्यद, निळकंठ बिरादार, दत्ता चाळकापुरे, रितेश सूर्यवंशी, सुनील कांबळे इत्यादी सह मोठ्या संख्येने उपस्थित होते

### भाजपा अनुसूचित जाती मोर्चा च्या जिल्हा उपाध्यक्षपदी रमेश कांबळे

तभा वृत्तसेवा

अहमदपूर दि. ११ जून : तालुक्यातील लेंन्डेगाव - वैरागड-बोरगाव ग्रुप ग्रामपंचायतचे माजी सरपंच रमेश कांबळे लेंन्डेगावकर यांची लातूर जिल्हा ग्रामीण च्या भारतीय जनता पक्षाच्या अनुसूचित जाती मोर्चा च्या जिल्हा उपाध्यक्ष पदी निवडीचे पत्र अनुसूचित जाती मोर्चाचे प्रदेश अध्यक्ष विश्र्वजित गायकवाड यांच्या हस्ते नुकतेच देण्यात आले. रमेश कांबळे यांनी सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक क्षेत्रात भरीव कार्य केले असून मागील काळात भारतीय जनता पक्षाच्या अनुसूचित जाती मोर्चाचे अहमदपूर तालुका अध्यक्ष म्हणून काम केले आसुन कार्याची दखल घेऊन रमेश कांबळे यांना जिल्हा उपाध्यक्ष म्हणून वर्णी लागली असल्याने सर्व स्तरातून रमेश कांबळे यांचे अभिनंदन केले जात आहे.

# मुख्यमंत्र्यांच्या हस्तक्षेपाने गायकवाड कुटुंबाला दिलासा

# बैल उपलब्धतेसह नुकसानभरपाईच्या निधीसही मिळाली मंजुरी

तभा वृत्तसेवा / रियाज मोमीन

वलांडी,दि. ११ जून : ग्रामीण भागातील श्रमजीवी कुटुंबांच्या संघर्षाची जाणीव ठेवत राज्य शासनाने तातडीने केलेल्या हस्तक्षेपामुळे भूमिहीन शेतमजूर काशिनाथ गायकवाड यांच्या कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला आहे. वीज पडून एकमेव बैल दगावल्यानंतर पत्नीला बैलाच्या जागी जूंपून शेतीची कामे करण्याची वेळ आलेल्या या कुटुंबाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानंतर नवीन बैल उपलब्ध करून देण्यात आला असून नुकसानभरपाईची रक्कमही मंजूर करण्यात आली आहे.



लातूर जिल्ह्यातील काशिनाथ गायकवाड हे भूमिहीन शेतमजूर आहेत. स्वतःची शेती नसतानाही बैलजोडीच्या मदतीने परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतात नांगरणी, वखरणी, मशागत आणि पेरणीची कामे करून ते आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. पत्नी हौसाबाई आणि मुलांसह संपूर्ण कुटुंबाचे जीवन या श्रमाधारित व्यवसायावरच अवलंबून आहे.

५ जून रोजी झालेल्या वादळी पावसादरम्यान वीज पडून त्यांच्या एका बैलाचा मृत्यू झाला. खरीप हंगामाच्या तोंडावरच ही घटना घडल्याने कुटुंबासमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले. पर्याय नसल्याने शेतीची कामे सुरू ठेवण्यासाठी काशिनाथ गायकवाड यांनी पत्नी हौसाबाई यांनाच बैलाच्या जागी जूंपून शेतातील कामे केली. श्रमजीवी ग्रामीण जीवनातील ही वेदनादायी वस्तुस्थिती समाजमाध्यमांवर व्हायरल झाल्यानंतर राज्यभरातून हळहळ व्यक्त करण्यात आली.

ही बाब मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निदर्शनास येताच त्यांनी मुख्यमंत्री सचिवालयाला तातडीने कार्यवाहीचे निर्देश दिले. त्यानंतर जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल, पशुसंवर्धन आणि कृषी विभागाने समन्वय साधत मदतकार्याला गती दिली.

पशुसंवर्धन विभागाच्या प्रयत्नांतून काही तासांतच नवीन बैल उपलब्ध करून देण्यात आला. जिल्हाधिकारी, तहसीलदार आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत हा बैल गायकवाड कुटुंबाकडे सुपूर्द करण्यात आला. त्यामुळे कुटुंबाच्या उपजीविकेचा आधार पुन्हा मजबूत झाला असून खरीप हंगामातील कामांना गती मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

नैसर्गिक आपत्तीमुळे जनावरांचा मृत्यू झाल्यास राज्य आपत्ती प्रतिसाद निधीतून आर्थिक मदत देण्याची तरतूद आहे. त्यानुसार आवश्यक पंचनामा व प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून दगावलेल्या बैलाची नुकसानभरपाई मंजूर करण्यात आली आहे. ही रक्कम थेट गायकवाड यांच्या बँक खात्यात जमा होणार आहे.

ग्रामीण भागातील गरीब व भूमिहीन कुटुंबांसाठी जनावरे ही केवळ शेतीची साधने नसून त्यांच्या उपजीविकेचा प्रमुख आधार असतात. त्यामुळे शासनाच्या तातडीच्या प्रतिसादामुळे गायकवाड कुटुंबाला केवळ आर्थिक मदतच मिळालेली नाही, तर संकटातून सावरण्याची नवी उभारीही मिळाली आहे. सामाजिक संवेदनशीलता आणि प्रशासनाची तत्परता यामुळे एका श्रमिक कुटुंबाचा संसार पुन्हा रुळावर येण्यास मदत झाली आहे.

**सरकारच्या मदतीमुळे मोठा दिलासा**

एका बैलाच्या मृत्यूनंतर आमच्यावर मोठे संकट आले होते. शेतीची कामे कशी करायची, कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा चालवायचा याची चिंता होती. मात्र सरकार आणि प्रशासनाने आमच्या अडचणीची दखल घेत तातडीने मदत केली. आता खरीप हंगामातील कामांची चिंता दूर झाली असून आम्ही नव्या उमेदीने कामाला सुरुवात करू. : हौसाबाई गायकवाड, शेतकरी पत्नी

# कासार शिरसी पोलीस ठाण्यात रक्तदान शिबिर

## ११० जणांनी केले रक्तदान रक्तदात्यांना हेल्मेट भेट

तभा वृत्तसेवा

कासार शिरसी दि. ११ जून : भालचंद्र ब्लड बैंक लातुर व रोटरी क्लब ऑफ मिडटाऊन लातुर आणि पोलिस ठाणे कासार शिरसी यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार दि.१० रोजी कासार शिरसी पोलीस ठाण्यात रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरात ११० रक्तदात्यांनी रक्तदान करत शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी रक्तदात्यांना हेल्मेट व रक्तदान केल्याचे प्रमाणपत्र भेट देण्यात आले.

या शिबिरात पोलीस अधिकारी, कर्मचारी, होमगार्ड , पत्रकार व नागरिकांनी रक्तदान केले.

त्याच बरोबर काही महिलांनीही या शिबिरात सहभागी होऊन रक्तदान केले. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन पोलिस उपविभागीय अधिकारी विशाल ढुमे यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिराप्रसंगी बोलताना कासार शिरसी पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक प्रताप गर्जे यांनी रक्तदानाचे महत्त्व सांगून रक्तदान हे श्रेष्ठदान असल्याचे सांगितले. रक्तदात्यामुळे अनेक रुग्णांचे प्राण वाचू शकतात त्यामुळे प्रत्येकांनी रक्तदान करावे असेही ते म्हणाले.

रस्त्यावरील वाढत्या प्रमाणात होणाऱ्या अपघातामुळे अनेक जण आपला प्राण गमावत आहेत त्यामुळे प्रत्येकांनी वाहने काळजीपूर्वक व सुरक्षित चालविण्याचे आवाहनही गर्जे यांनी केले. सुरक्षित प्रवासाचे संकल्प करूनच रक्तदात्यांना हेल्मेट भेट देत असल्याचे त्यांनी सांगितले.

या रक्तदान शिबिराला यशस्वी करण्यासाठी पो .कॉ. राजू हिंगमिरे, श्रीहरी डावरगावे, आबासाहेब इंगळे, बालाजी जाधव, श्रीकांत वरवटे, अमोल नागमोडे किशोर तपसे सह आदींनी परिश्रम घेतले.



### एनसीसी कॅडेटची अग्निवीरमध्ये निवड ; महाविद्यालयातर्फे सत्कार



निलंगा दि. ११ जून : येथील महाराष्ट्र महाविद्यालयाच्या एनसीसी विभागातील कॅडेट शाहूराज काकडे याची भारतीय सैन्य दलातील प्रतिष्ठित अग्निवीर पदासाठी निवड झाल्याबद्दल महाविद्यालयातर्फे त्याचा सत्कार करण्यात आला.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. एन. कदम यांनी विद्यार्थ्याचा शाल व पुष्पगुच्छ देऊन गौरव केला. आपल्या मनोगतात त्यांनी सांगितले की, विद्यार्थ्याने कठोर परिश्रम, नियमित सराव, शिस्तबद्ध दिनचर्या आणि जिद्दीच्या बळावर हे यश संपादन केले आहे. त्याचे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असून महाविद्यालयासाठी अभिमानाची बाब आहे. अग्निवीर निवडीसाठी कॅडेट शाहूराज याने एनसीसी प्रशिक्षणाबरोबरच शारीरिक तंदुरुस्ती, लेखी परीक्षा आणि विविध निवड प्रक्रियांसाठी सातत्याने मेहनत घेतली. अनेक अडचणींवर मात करत त्याने हे यश मिळविले. त्याच्या या यशामागे कुटुंबीयांचे मार्गदर्शन, शिक्षकांचे सहकार्य आणि एनसीसी विभागाचे प्रशिक्षण महत्त्वाचे ठरले.

यावेळी एनसीसी अधिकारी डॉ. एस. पी. बसूदे यांनी विद्यार्थ्याच्या मेहनतीचे कौतुक करत, देशसेवेची संधी मिळणे ही अभिमानाची बाब असल्याचे सांगितले. निवड झालेल्या कॅडेटनेही आपल्या यशाचे श्रेय आई-वडील, शिक्षक आणि एनसीसी प्रशिक्षणाला दिले.

या सत्कार समारंभास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# जागतिक दृष्टिदान दिनानिमित्त डॉ. शीतल पेद्दावाड व सचिन निलंकर यांचा गौरव

त भा वृत्तसेवा

उदगीर,दि. ११ जून : जिव्हाळा ग्रुप, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती आणि उदयगीरी लॉयन्स नेत्र धर्मादाय रुग्णालय, उदगीर यांच्या संयुक्त विद्यमाने लोकशिक्षक विश्र्वनाथराव मुडपे व रमाकांत बनशेळकीकर यांच्या वाढदिवसानिमित्त डॉ रामप्रसाद लखोटिया यांच्या मार्गदर्शनाखाली *'जागतिक दृष्टिदान दिन'* उत्साहात साजरा करण्यात आला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिव्हाळा ग्रुपचे अध्यक्ष श्री. विश्र्वनाथराव माळेवाडीकर हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार मा. मनोहरराव पटवारी, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूरचे माजी संचालक विस्तार शिक्षण प्रा. डॉ. अनिल भिकाने तसेच महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अध्यक्ष प्राचार्य विजयकुमार पाटील उपस्थित होते.

यावेळी उदयगिरी लॉयन्स नेत्र रुग्णालयाच्या मुख्य नेत्रतज्ज्ञ डॉ. शीतल पेद्दावाड यांना नेत्रसेवा क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल *डॉ. भालचंद्र स्मृती पुरस्कार* प्रदान करण्यात आला. तसेच नेत्र सहाय्यक सचिन निलंकर यांना उत्कृष्ट सेवेसाठी उत्कृष्ट नेत्र तंत्रज्ञ सेवा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

डॉ शीतल पेद्दावाड यानी एक वर्षाच्या बालकापासून कोणीही नेत्रदान करू शकते तसेच मृत्यूनंतर ४ ते ६ तासांच्या आत नेत्रदान प्रक्रिया पूर्ण करावी लागते, त्यामुळे तात्काळ नेत्रतज्ज्ञांशी संपर्क साधणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

डॉ अनिल भिकाने यानी त्यांच्या भाषणात नेत्रदानाचे महत्त्व विशद करताना *नेत्रदान हे महादान* असल्याचे सांगितले. मृत्यूनंतर नेत्रदानाद्वारे दोन अंध व्यक्तींना दृष्टी मिळू शकते, त्यामुळे प्रत्येक नागरिकाने नेत्रदानाचा संकल्प करावा, असे आवाहन त्यांनी केले.

प्रा मनोहरराव पटवारी यानी समाजात नेत्रदानाविषयी व्यापक जनजागृती निर्माण करणे ही काळाची गरज असल्याचे नमूद करताना, नेत्रदानाचा संकल्प केलेल्या व्यक्तींनी आपल्या कुटुंबीयांना याबाबत माहिती देणे आवश्यक असल्याचे सांगितले.

यावेळी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे प्रा. बळीराम भुक्तरे, मराठवाडा जनता विकास परिषदेचे सचिव प्रा. एस. एस. पाटील, ज्येष्ठ नागरिक संघाचे मुरलीधर जाधव, सामाजिक कार्यकर्त्या सौ. अरुणा भिकाने यांनी आपले मनोगतातून सत्कारमुर्तीच्या कार्याचा गौरव करून शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाची सुरुवात अरुणा ओसवाल अंध विद्यालयाचे चव्हाण व त्यांच्या विद्यार्थ्यांच्या चमुने तसेच विठ्ठलराव फुलसे यांनी सादर केलेल्या स्वागतगीताने झाली. देविदासराव नादरगे यांनी प्रास्ताविकातून जागतिक दृष्टिदान दिनाचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लक्ष्मीकांत बिडवई यांनी केले, तर आभार प्रदर्शन दशरथराव शिंदे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पांडूरंग बोडके, बाबुराव वाघमारे, गणेश मुंडे, प्रशांत पांचाळ, शशीकांत पाटील, आदींनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमास प्राचार्य बाबुराव लहाने, रोटरी क्लबचे सचिव विक्रम हालकीकर, ज्येष्ठ पत्रकार सुरेश पाटील नेत्रगावकर, रामविलास नावंदर,प्रा. बाबुराव माशाळकर, माजी प्राचार्य डॉ सतीश कुलकर्णी, मोहनराव खिंडीवाले, योगशिक्षक शिवमूर्ती भातांब्रे, मनोहर कुलकर्णी, सोपानराव माने, शंकरराव साबणे, नवनाथ पाटील वैजनाथ पंचगल्ले चंद्रकांत रोडगे, दिलीप कंधारे , लहुदास याचावाड, वाडेकर यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितानी यावेळी मरणोत्तर नेत्रदान करण्याचा संकल्प केला .

# दादा'च्या आठवणींना उजाळा

# देवणीत राष्ट्रवादी काँग्रेसचा २७ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

तभा वृत्तसेवा

वलांडी दि. ११ जून : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या २७ व्या वर्धापन दिनानिमित्त देवणी येथे साईराम होंडा शोरूमसमोर पक्षाचा ध्वज फडकावून तसेच दिवंगत नेते 'दादा' यांच्या प्रतिमेस अभिवादन करून वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला.




यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांनी दिवंगत 'दादा' यांच्या आठवणींना उजाळा देत त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. दादा... हा पहिलाच वर्धापन दिन आहे, ज्यात तुम्ही आमच्यात नाहीत. राष्ट्रवादी काँग्रेसचा वर्धापन दिन आला की तुमचा उत्साह, कार्यकर्त्यांप्रती असलेले प्रेम, पक्षावरील निष्ठा आणि झेंड्याविषयीचा अभिमान डोळ्यासमोर उभा राहायचा. यावर्षी सर्व काही आहे, मात्र दादा तुम्ही नाही, अशा शब्दांत कार्यकर्त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा 'दादा' यांच्यासाठी केवळ पक्ष नव्हता, तर त्यांचा श्र्वास, त्यांचे कुटुंब आणि त्यांचे सर्वस्व होते. त्यांनी कार्यकर्त्यांवर केलेले संस्कार, पक्षनिष्ठा आणि प्रेम कायम प्रेरणादायी राहील, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. जनतेचा विकास, सामाजिक न्याय आणि लोकशाही मूल्यांच्या जपणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सदैव कटिबद्ध राहील, असा संकल्पही यावेळी करण्यात आला.

वर्धापन दिनानिमित्त नुकतेच पंचायत समिती सदस्य म्हणून निवडून आलेले गजानन भोपणीकर यांचा तसेच तालुका कार्याध्यक्ष युसूफ महेबूब सय्यद व युवक कार्यकर्ते उंटवाले यांच्या वाढदिवसानिमित्त पक्षाच्या वतीने सत्कार करण्यात आला. त्यांना पुढील राजकीय व सामाजिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

या कार्यक्रमास तालुकाध्यक्ष महेश जाधव, माजी आमदार धर्माजी सोनकवड्डे, पंचायत समिती सदस्य गजानन भोपणीकर, नगरसेवक अमित सूर्यवंशी, तालुका कार्याध्यक्ष युसूफ सय्यद ,बिरादार, उंटवाले, चालकापुरे, रितेश सूर्यवंशी, विनोद कापडे, सुनिल कांबळे, चंद्रकांत गुड्डा यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ६ वर्षांपासून प्रलंबित असलेला शिवरस्ता अखेर मोकळा प्रशासनाची कौतुकास्पद कामगिरी

तभा वृत्तसेवा

निलंगा दि. ११ जून : निलंगा तालुक्यातील अंबुलगा बु. ते आंबेवाडी शिवरस्त्यावरील अतिक्रमण हटवून प्रशासनाने दोन्ही बाजूंच्या शेतकऱ्यांच्या सहकार्याने अंदाजे ५०० फूट रस्ता शेतकऱ्यांसाठी मोकळा करून दिला आहे. गेल्या ६ वर्षांपासून प्रलंबित असलेला हा प्रश्न मार्गी लागल्याने परिसरातील शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त होत आहे.



हा शिवरस्त्या संदर्भात गेल्या काही काळापासून वाद निर्माण झाला होता. संबंधित शेतकरी जमशेदबी राजेसाहेब जमादार यांनी रस्ता खुला करण्यासाठी निलंगा तहसीलदार प्रसाद कुलकर्णी व उपविभागीय अधिकारी शरद झाडके यांच्याकडे रीतसर मागणी केली होती. दुसरीकडे, ताहेराबी अबूतालीब जमादार आणि इतर सहा जणांनी व १३ ब मधील शेतकरी सचिन शिवराज गिरी यांनी रस्ता होऊ नये म्हणून तक्रारी अर्ज दाखल करत अडवणूक करण्याचा प्रयत्न केला होता.

शेतकऱ्यांचा वाढता वाद पाहता, मंडळ अधिकारी अमोल सोमवंशी आणि तलाठी बाबुराव माने भूमी अभिलेख कार्यालयातील कांबळे यांनी औराद शा.पोलीस प्रशासनाच्या मदतीने थेट वादग्रस्त शेताच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली. प्रशासनाने दोन्ही बाजूंच्या शेतकऱ्यांना सामोपचाराने समज दिली. त्याला सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याने अखेर १६ फुटांचा रस्ता अतिक्रमणमुक्त करण्यात आला आहे.

गेल्या ६ वर्षांपासून या भागातील शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी आणि शेतमालाची वाहतूक करण्यासाठी प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत होता. ही अडचण दूर झाल्यामुळे गट नंबर ४५५ आणि गट नंबर १३ ब आंबेवाडी मधील दोन्ही गावचा शिवरस्ता मोकळा करून देण्यात आला आहे. सर्व शेतकऱ्यांनी प्रशासनाच्या या धाडसी व सामोपचारी निर्णयाचे मनापासून स्वागत केले आहे. या १६ फुटांच्या रस्त्यामुळे आता परिसरातील शेतकऱ्यांचा शेतीमाल बाजारात नेण्यासाठी व शेती कामासाठी शेताकडे जाणे येणे सोईचे होणार आहे.

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## भारतीय सैन्य दलात निवड झाल्याबद्दल कृष्णा डोंबाळे यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.११ जून -**

शंकरराव पाटील महाविद्यालय, भूम येथील बी.ए. प्रथम वर्षाचा विद्यार्थी कृष्णा शेषराव डोंबाळे (रा. वंजारवाडी) याची भारतीय सैन्य दलात निवड झाल्याबद्दल महाविद्यालयात त्याचा सत्कार करण्यात आला.



महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अनुराधा जगदाळे यांच्या हस्ते व समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. तानाजी बोराडे यांच्या उपस्थितीत पुष्पगुच्छ देऊन त्याचा गौरव करण्यात आला. यावेळी प्राचार्या डॉ. जगदाळे यांनी कृष्णा डोंबाळे यांचे अभिनंदन करून देशसेवेच्या कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कृष्णा डोंबाळे यांच्या यशाबद्दल परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# अणदूर ग्रामपंचायत निवडणुकीचे आरक्षण जाहीर; दिग्गजांची गणिते बिघडली, सुरक्षित वॉर्डच्या शोधाला वेग




**श्रीकांत अणदूरकर**
**अणदूर, दि.११ जून -**

तुळजापूर तालुक्यातील राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या अणदूर ग्रामपंचायत निवडणूक २०२६ साठी प्रभागनिहाय आरक्षण जाहीर झाले असून, आरक्षणाच्या सोडतीनंतर गावातील राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलल्याचे चित्र दिसून येत आहे. अनेक दिग्गज इच्छुकांच्या वॉर्डांमध्ये अपेक्षित आरक्षण न पडल्याने त्यांची मोठी अडचण झाली असून, आता सुरक्षित वॉर्डच्या शोधासाठी राजकीय हालचालींना वेग आला आहे.

विशेष म्हणजे, गावातील वॉर्ड क्रमांक १, २ आणि ४ मध्ये सर्वसाधारण पुरुषांसाठी (ओपन) आरक्षण न पडल्याने अनेक संभाव्य उमेदवारांची गोची झाली आहे. दुसरीकडे वॉर्ड क्रमांक ५ आणि ६ मध्ये प्रत्येकी दोन अशा एकूण चार सर्वसाधारण पुरुष जागा उपलब्ध झाल्याने इच्छुकांची धावपळ या प्रभागांकडे वळली आहे. अनपेक्षित आरक्षणामुळे अनेक अनुभवी नेत्यांच्या राजकीय भविष्याबाबत संभ्रम निर्माण झाला असून, निवडणूक लढविण्यासाठी नव्या रणनीती आखल्या जात आहेत. तुळजापूर तालुक्यातील सर्वात मोठ्या ग्रामपंचायतींपैकी एक असलेल्या अणदूर ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी आरक्षण सोडत हुतात्मा सभागृहात पार पडली.

मंडळ अधिकारी पी. एस. भोकरे, ग्रामपंचायत अधिकारी संजय माशाळे आणि तलाठी जे. जे. शेख यांच्या उपस्थितीत ही प्रक्रिया पार पडली.

ग्रामपंचायतीत एकूण १७ सदस्यांची निवड होणार असून त्यामध्ये ९ महिला आणि ८ पुरुष सदस्यांचा समावेश आहे.

महिलांसाठी सर्वसाधारण महिला ५, ओबीसी महिला २, मागास प्रवर्ग महिला २. पुरुषांसाठी सर्वसाधारण पुरुष ५, ओबीसी पुरुष २, मागास प्रवर्ग पुरुष १. ग्राम पंचायतीमध्ये एकूण सहा वॉर्ड असून, वॉर्ड क्रमांक ४ मध्ये दोन सदस्य तर उर्वरित पाच वॉर्डांमध्ये प्रत्येकी तीन सदस्य निवडले जाणार आहेत. याशिवाय सरपंचाची निवड थेट जनतेतून होणार आहे. प्रभागनिहाय आरक्षण प्रभाग क्रमांक १ अनुसूचित जाती (एससी) महिला, ओबीसी पुरुष, सर्वसाधारण महिला.

प्रभाग क्रमांक २ ओबीसी पुरुष, सर्वसाधारण महिला २. प्रभाग क्रमांक ३ अनुसूचित जाती महिला, ओबीसी महिला, सर्वसाधारण पुरुष. प्रभाग क्रमांक ४ अनुसूचित जाती पुरुष, ओबीसी महिला. प्रभाग क्रमांक ५ सर्वसाधारण महिला, सर्वसाधारण पुरुष २. प्रभाग क्रमांक ६ सर्वसाधारण महिला, सर्वसाधारण पुरुष २. आरक्षण जाहीर होताच गावात निवडणुकीच्या चर्चांना उधाण आले असून, कोण कोणत्या वॉर्डातून निवडणूक लढवणार, किती पॅनल उभे राहणार आणि कोणत्या गटाची ताकद वाढणार याबाबत राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

आगामी काळात प्रचाराच्या हालचालींना वेग येण्याची शक्यता असून अणदूरचे राजकीय वातावरण आतापासूनच तापू लागले आहे.

दरम्यान, निवडणूक प्रक्रिया शांततेत व पारदर्शकपणे पार पडण्यासाठी नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन ग्रामपंचायत प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

### वॉर्ड ५ आणि ६ ठरले 'हॉटस्पॉट'

वॉर्ड क्रमांक ५ आणि ६ मध्ये प्रत्येकी दोन सर्वसाधारण पुरुष जागा उपलब्ध झाल्याने अनेक इच्छुक उमेदवारांनी या प्रभागांकडे मोर्चा वळविला आहे. तर वॉर्ड १, २ आणि ४ मध्ये ओपन पुरुष आरक्षण नसल्याने अनेक दिग्गजांची निवडणुकीची गणिते कोलमडल्याची चर्चा गावभर रंगू लागली आहे.

# पालखी मार्गाची दुरवस्था; परंडा-मुंगशी रस्त्यावरील खड्ड्यांमुळे वारकऱ्यांची चिंता वाढली

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.११ जून -**

संतश्रेष्ठ श्री संत एकनाथ महाराज यांच्या पैठण ते पंढरपूर पालखी सोहळ्याचा मार्ग परंडा तालुक्यातून जात असला, तरी या मार्गावरील रस्त्यांची दुरवस्था कायम असल्याने यंदाही वारकरी भाविकांना मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विशेषतः परंडा-मुंगशी मार्गावर मोठमोठे खड्डे पडल्याने भाविकांसह वाहनचालकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे.

या रस्त्यावरील अनेक खड्ड्यांमध्ये पावसाचे पाणी साचत असल्याने त्यांची खोली लक्षात येत नाही. त्यामुळे वारकरी भाविकांना दुखापत होण्याचा तसेच अपघातांचा धोका वाढला आहे. पुढील महिन्यात संत एकनाथ महाराजांचा पालखी सोहळा याच मार्गाने जाणार असल्याने प्रशासनाने तातडीने उपाययोजना करण्याची गरज व्यक्त होत आहे.

विशेष म्हणजे, पालखी मार्गावरील पुढील टप्प्यातील कामे सोलापूर सार्वजनिक बांधकाम विभागाने जवळपास दोन वर्षांपूर्वी पूर्ण केली आहेत. मात्र परंडा तालुक्याच्या हद्दीतील काम अद्यापही अपूर्ण असल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे. परंडा तालुक्याची पश्चिम सरहद्द संपल्यानंतर अवघ्या दोन किलोमीटर अंतरावर सोलापूर जिल्ह्याची हद्द सुरू होते. त्या भागातील रस्ते व पुलांची कामे पूर्ण झाली असताना धाराशिव जिल्ह्यातील पालखी मार्गाचे काम रखडलेले असल्याचा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

सरकारकडून पालखी मार्गांच्या देखभाल-दुरुस्तीसाठी वेळोवेळी निधी उपलब्ध करून दिला जात असतानाही परंडा तालुक्यातील मार्गाकडे दुर्लक्ष होत असल्याची भावना भाविकांमध्ये आहे. पैठण ते पंढरपूर या संपूर्ण पालखी मार्गाचे बहुतांश काम पूर्ण झाले असताना परंडा तालुक्यातील रस्ता अद्याप अपूर्ण राहिल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

खराब रस्त्यामुळे वाहनचालकांना वाहन चालविताना मोठी कसरत करावी लागत असून प्रवाशांनाही त्रास सहन करावा लागत आहे. परंडा तालुका आधीच मागास म्हणून ओळखला जात असताना रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे विकासाच्या प्रश्नावर पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे.

यामुळे संबंधित सार्वजनिक बांधकाम विभाग व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालून पालखी मार्गावरील अपूर्ण कामे पूर्ण करावीत, तसेच परंडा-मुंगशी रस्त्याची दुरुस्ती व नव्या रस्त्याचे काम हाती घ्यावे, अशी मागणी वारकरी, भाविक आणि सर्वसामान्य नागरिकांकडून होत आहे.

### पालखी येणार, रस्ता कधी सुधारणार?...

संत एकनाथ महाराजांचा पालखी सोहळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असताना परंडा तालुक्यातील पालखी मार्गाची दुरवस्था प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण करत आहे. वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी तातडीने रस्ते दुरुस्तीची मागणी जोर धरत आहे.

# तुकडेबंदी कायद्यातून दिलासा; परंडा तालुक्यातील शेकडो रखडलेले जमीन व्यवहार होणार नियमित

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.११ जून -**

महाराष्ट्र धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबतच्या अधिनियमामुळे अनेक वर्षांपासून रखडलेल्या कमी क्षेत्राच्या जमीन व्यवहारांना राज्य शासनाने मोठा दिलासा दिला आहे. प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राचे झालेले जमीन व्यवहार नियमित करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय शासनाने घेतल्याने परंडा तालुक्यातील शेकडो जमीनधारकांना याचा लाभ होणार आहे. शासनाच्या निर्णयानुसार, १५ नोव्हेंबर १९६५ ते १५ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत १, २, ५ गुंठे किंवा त्यापेक्षा कमी क्षेत्राचे जमीन व्यवहार झाले असतील आणि संबंधित जमीन गावठाण हद्दीपासून ५०० मीटर परिसरात असेल, तर अशा व्यवहारांचे नियमितीकरण करण्यात येणार आहे.

तालुक्यात अनेक ठिकाणी जमीन खरेदी-विक्रीचे व्यवहार नोंदणीकृत दस्ताद्वारे झाले असले तरी तुकडेबंदी कायद्याच्या अटींमुळे फेरफार नोंदी मंजूर झालेल्या नाहीत. परिणामी, अनेक खरेदीखतधारकांची नावे सातबारा उताऱ्यावर मालकी हक्कात नोंद न होता 'इतर अधिकार' या सदरात राहिली आहेत. तसेच काही प्रकरणांमध्ये नोंदणीकृत दस्त असूनही फेरफार नोंदी प्रलंबित आहेत. याशिवाय स्टॅम्प पेपर किंवा नोटरीवर झालेले, मात्र नोंदणीकृत नसलेले व्यवहारही या प्रक्रियेत समाविष्ट करण्यात आले आहेत. अशा व्यवहारांची प्रथम नोंदणी करून त्यानंतर फेरफार नोंदीची कार्यवाही केली जाणार आहे.

या निर्णयामुळे परंडा तालुक्यातील अनेक वर्षांपासून अडकलेल्या जमीन व्यवहारांना कायदेशीर मान्यता मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असून संबंधितांना मालकी हक्काच्या नोंदी नियमित करून घेणे शक्य होणार आहे. शासनाच्या या निर्णयाचा लाभ घेण्यासाठी तालुक्यातील सर्व पात्र नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह संबंधित ग्राम महसूल अधिकारी यांच्याकडे अर्ज सादर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### कोणत्या व्यवहारांना मिळणार लाभ?

१५ नोव्हेंबर १९६५ ते १५ ऑक्टोबर २०२४ दरम्यानचे व्यवहार, १, २, ५ गुंठे किंवा कमी क्षेत्राचे व्यवहार, गावठाण हद्दीपासून ५०० मीटर परिसरातील जमीन नोंदणीकृत तसेच स्टॅम्प/नोटरीवरील अनोंदणीकृत व्यवहार, प्रलंबित फेरफार नोंदी असलेली प्रकरणे.

### जमीनधारकांसाठी सुवर्णसंधी

तुकडेबंदी कायद्यामुळे वर्षानुवर्षे रखडलेले व्यवहार नियमित होणार असल्याने सातबारा उताऱ्यावर मालकी हक्काची नोंद मिळविण्याचा मार्ग सुकर झाला आहे. त्यामुळे जमीनधारकांनी आवश्यक कागदपत्रांसह तातडीने अर्ज करण्याचे आवाहन महसूल विभागाकडून करण्यात येत आहे.

# संगमेश्वर प्रकल्पातील ९९ लाखांच्या संरक्षण भिंतीच्या कामावर प्रश्नचिन्ह

### निकृष्ट कामाचा ग्रामस्थांचा आरोप...

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.११ जून -**

संगमेश्वर प्रकल्प (ईट) येथील सांडव्या खालील नदीपात्रामध्ये उभारण्यात आलेल्या संरक्षण भिंतीच्या कामावर ग्रामस्थ व शेतकऱ्यांनी गंभीर आक्षेप घेतले असून, संबंधित ठेकेदाराने अत्यंत निकृष्ट दर्जाचे काम केल्याचा आरोप केला आहे. सुमारे ९९ लाख ६९ हजार ३०० रुपये खर्चाच्या या कामामध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता व भ्रष्टाचार झाल्याची चर्चा परिसरात रंगू लागली आहे.



ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, संरक्षण भिंतीचे काम दर्जेदार झाल्याचे भासविण्यासाठी भिंतीलगत मातीचा ढिगारा टाकून मूळ बांधकाम झाकण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. प्रत्यक्षात नवीन संरक्षण भिंत उभारण्याऐवजी जुन्या जीर्ण भिंतीवर केवळ प्लास्टर व मलमपट्टी करून शासनाची दिशाभूल करण्यात आल्याचा आरोप करण्यात येत आहे.

संगमेश्वर प्रकल्पाच्या सांडव्या खालील नदीपात्रात दरवर्षी पूरस्थिती निर्माण होत असल्याने नदीकाठावरील शेतजमिनींची मोठ्या प्रमाणावर धूप होते. याच पार्श्वभूमीवर शेतजमिनींचे संरक्षण करण्यासाठी शासनाने मोठा निधी मंजूर केला होता. मात्र मंजूर निधीचा योग्य वापर न करता संबंधित विभाग व ठेकेदाराने संगनमताने आर्थिक लाभ घेतल्याचा आरोप शेतकरी वर्गातून केला जात आहे.

ग्रामस्थांनी प्रत्यक्ष पाहणीदरम्यान केलेल्या निरीक्षणानुसार, भिंतीचे कॉंक्रिट हातानेच निघत असून बांधकामात आवश्यक प्रमाणात सिमेंटचा वापर झालेला दिसत नाही. त्यामुळे संरक्षण भिंतीच्या गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. भविष्यात मोठा पूर आल्यास ही भिंत कोसळण्याची शक्यता असल्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

दरम्यान, या कामाची गुणवत्ता तपासण्यासाठी गुणवत्ता नियंत्रण विभागाच्या अधिकाऱ्यांनी तातडीने प्रत्यक्ष स्थळी भेट देऊन सखोल चौकशी करावी, तसेच तपासणी पूर्ण होईपर्यंत संबंधित ठेकेदाराचे बिल रोखून धरावे, अशी मागणी ग्रामस्थ व शेतकरी करीत आहेत. याशिवाय या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषी आढळणाऱ्या अधिकारी व ठेकेदारांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

संगमेश्वर प्रकल्पातील संरक्षण भिंतीच्या कामाबाबत करण्यात आलेले आरोप सत्य ठरल्यास शासनाच्या लाखो रुपयांच्या निधीचा अपव्यय झाल्याचे स्पष्ट होणार असून, प्रशासनाने या गंभीर प्रकरणाकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

> सदरील संरक्षण भिंतीचे काम काम हे माझ्या अधिकाऱ्यांच्या निगराणीखाली झाले असून ते काम चांगल्या प्रकारे झाले आहे. अतिशय चांगलं झाले आहे. तसं असेल तर तक्रार द्या.
>
> **- निकिता कटकमवार,**
> (शाखाधिकारी क्रमांक ११,ईट)

### ▸▸ उच्चशिक्षित तरुणांची गावोगावी शेकडोंची संख्या : मुलींच्या पालकांच्या अपेक्षा ठरताहेत कारणीभूत?

# शेतकरी नवरा नको गं बाई : मुलींच्या अपेक्षांच्या ओझ्यामुळे बिनलग्नाचे राहताहेत नवरोबा!

**अनिल आगलावे**
**धाराशिव, दि.११ जून -**

धाराशिव - ग्रामीण महाराष्ट्रातील सामाजिक वास्तव झपाट्याने बदलत असून त्याचा सर्वाधिक परिणाम तरुणांच्या वैवाहिक आयुष्यावर होताना दिसत आहे. एकेकाळी २१ ते २२ व्या वर्षी सहजपणे विवाहबंधनात अडकणारे ग्रामीण भागातील तरुण आज तिशी ओलांडूनही अविवाहित राहत असल्याचे चित्र अनेक गावांमध्ये दिसून येत आहे. शेती व्यवसायाविषयीचा बदलता दृष्टिकोन, वाढत्या आर्थिक अपेक्षा, रोजगाराची अस्थिरता आणि जोडीदाराबाबतच्या बदललेल्या संकल्पना यामुळे ग्रामीण भागात विवाहाची समस्या गंभीर होत चालली आहे.

धाराशिव जिल्ह्यासह राज्यातील अनेक ग्रामीण भागांमध्ये प्रत्येक गावात ४० ते ५० उच्चशिक्षित आणि सक्षम तरुण केवळ योग्य वधू न मिळाल्याने अविवाहित असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. काही ठिकाणी चाळिशी ओलांडलेल्या तरुणांनाही विवाहासाठी प्रयत्न करावे लागत असल्याने हा प्रश्न केवळ वैयक्तिक न राहता सामाजिक चिंतेचा विषय बनला आहे. गेल्या दोन दशकांत विवाह संस्थेबद्दलचा दृष्टिकोन पूर्णपणे बदलला आहे. पूर्वी कुटुंब, संस्कार आणि नातेसंबंध यांना महत्त्व दिले जात होते. आता आर्थिक स्थैर्य, करिअर, राहणीमान आणि भविष्याची सुरक्षितता या बाबींना अधिक प्राधान्य दिले जात आहे. अनेक ठिकाणी मुलींच्या कुटुंबीयांकडून अनेक अपेक्षा स्पष्टपणे मांडल्या जातात. मुलगा एकुलता एक असावा, पुणे, मुंबईसारख्या शहरात चांगल्या पगाराची नोकरी असावी, गावात स्वतःचे प्रशस्त घर किंवा बंगला असावा, शहरात स्वतःचा फ्लॅट ही असावा, शेतीही असावी, मात्र शेतीवर पूर्ण अवलंबित्व नसावे, आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि स्थिर उत्पन्नाचा स्रोत असावा. या वाढत्या अपेक्षांमुळे अनेक सक्षम आणि शिक्षित ग्रामीण तरुण विवाहाच्या स्पर्धेत मागे पडत आहेत.



विवाह लांबणीवर पडल्याने केवळ तरुणच नव्हे तर त्यांच्या कुटुंबीयांनाही मानसिक तणावाचा सामना करावा लागत आहे. समाजातील चर्चा, नातेवाईकांचे प्रश्न, भविष्याची चिंता आणि सतत होणारी नकारात्मक तुलना यामुळे अनेक कुटुंबे मानसिक दडपणाखाली वावरताना दिसत आहेत. मानसिक खच्चीकरण, आत्मविश्वासात घट आणि सामाजिक अलिप्तता यासारख्या समस्या वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे हा प्रश्न केवळ वैयक्तिक नसून सामाजिक आणि मानसिक आरोग्याशी निगडित मुद्दा बनत चालला आहे. ही परिस्थिती केवळ ग्रामीण भागापुरती मर्यादित नाही. शहरी भागातही जोडीदार निवडताना आर्थिक स्थैर्य आणि करिअरला अधिक महत्त्व दिले जात आहे. मात्र ग्रामीण भागात रोजगाराच्या मर्यादित संधी आणि शेती व्यवसायाविषयीचा नकारात्मक दृष्टिकोन यामुळे ही समस्या अधिक तीव्र स्वरूपात दिसून येत आहे.

विवाह संस्था, कुटुंब व्यवस्था आणि सामाजिक मूल्यांमध्ये होत असलेल्या बदलांचे हे प्रतिबिंब असून ग्रामीण भागातील वाढती अविवाहित तरुणांची संख्या ही भविष्यात गंभीर सामाजिक परिणाम घडवू शकते. शेती व्यवसायाला प्रतिष्ठा मिळवून देणे, ग्रामीण रोजगाराच्या संधी वाढविणे, कृषिपूरक उद्योगांना प्रोत्साहन देणे आणि विवाहाबाबत वास्तववादी अपेक्षा ठेवणे या दिशेने समाजाने सकारात्मक पावले उचलण्याची गरज असल्याचे मत व्यक्त होत आहे.

शेती हा देशाचा कणा मानला जातो. मात्र शेतकरी कुटुंबेच जर शेती व्यवसायाकडे दुय्यम नजरेने पाहू लागली, तर भविष्यात शेती क्षेत्र आणि ग्रामीण सामाजिक संरचना यांच्यासमोर नवे आव्हान उभे राहू शकते. बदलत्या काळानुसार अपेक्षा असणे स्वाभाविक असले, तरी आर्थिक निकषांपलीकडे जाऊन परस्पर समजूतदारपणा, मूल्ये आणि सहजीवनाची तयारी यांनाही तितकेच महत्त्व देण्याची आवश्यकता असल्याचे मत समाजातून व्यक्त होत आहे.

### शेतीतील अनिश्चितता ठरतेय मोठे कारण...

या मानसिकतेमागे शेती व्यवसायातील वाढती अस्थिरता हे प्रमुख कारण मानले जात आहे. पावसाचे अनिश्चित स्वरूप, उत्पादन खर्चात वाढ, शेतीमालाला मिळणारा अपुरा भाव, हमीभावाचा अभाव, बाजारपेठेतील चढ-उतार, कर्जपुरवठ्याच्या मर्यादा आणि शेतकरी हिताच्या धोरणांबाबतची असमाधानकारक परिस्थिती यामुळे शेती हा फायदेशीर व्यवसाय राहिलेला नाही, अशी भावना समाजात निर्माण झाली आहे. शेतकरी दिवसरात्र मेहनत करून पिकवलेल्या उत्पादनाला योग्य भाव मिळेल याची शाश्वती नसल्याने शेती म्हणजे जणू काही जुगार ठरत असल्याची भावना सर्वसामान्यांमध्ये आहे. त्यामुळे मुलींच्या दृष्टीनेही शेती व्यवसाय हा सुरक्षित पर्याय वाटत नाही.

### उच्चशिक्षित तरुणही अडकले बेरोजगारीच्या विळख्यात!

ग्रामीण भागातील अनेक तरुण उच्च शिक्षण घेतल्यानंतरही बेरोजगारीशी झुंज देत आहेत. स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यासाठी सात ते आठ वर्षे खर्च करूनही अपेक्षित यश न मिळाल्याने अनेक जण पुन्हा गावी परतून शेतीकडे वळत आहेत. काही तरुणांनी दुग्धव्यवसाय, पोल्ट्री, कृषिपूरक उद्योग अशा व्यवसायांना सुरुवात केली असली तरी त्या व्यवसायांची आर्थिक स्थिरता कितपत राहील, याबाबतही संभ्रम कायम असतो. त्यामुळे चांगले उत्पन्न मिळवणाऱ्या तरुणांनाही विवाहासाठी योग्य जोडीदार मिळणे कठीण होत असल्याचे वास्तव आहे.

### शेतकरी नवरा नकोच...!

ग्रामीण समाजात सध्या सर्वाधिक ऐकू येणारे वाक्य म्हणजे - शेतकरी नवरा नको गं बाई! विशेष म्हणजे, ही मानसिकता केवळ शहरांपुरती मर्यादित राहिलेली नाही. स्वतः शेती करणाऱ्या कुटुंबातील मुली आणि त्यांचे पालकसुद्धा आपल्या मुलीसाठी शेतकरी मुलाऐवजी सरकारी नोकरी करणारा किंवा शहरात चांगल्या कंपनीत नोकरी करणारा मुलगा शोधण्याला प्राधान्य देत आहेत. अनेक पालक स्पष्टपणे सांगतात की, मुलगा शिपाई किंवा लहानशा पदावर नोकरी करत असला तरी चालेल; मात्र शेती व्यवसाय करणारा नको. परिणामी, शेतीला दुय्यम स्थान दिले जात असून ग्रामीण तरुणांपुढे विवाहाचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

### विवाहाचे वाढते वय चिंतेचा विषय...

दोन दशकांपूर्वी ग्रामीण भागात मुलांचे विवाह साधारणतः २१ ते २४ वयोगटात होत असत. आज मात्र हेच सरासरी वय ३० ते ३५ वर्षांपर्यंत पोहोचले आहे. अनेक तरुण लग्नासाठी वारंवार स्थळे पाहत असूनही अपेक्षित जुळवाजुळव होत नसल्याने मानसिक तणावाचा सामना करत आहेत. काही तरुण केवळ विवाहाच्या दृष्टीने शहरांमध्ये नोकरी शोधण्याचा प्रयत्न करतात. मात्र त्या प्रक्रियेत त्यांचे वय वाढत जाते आणि विवाहाची शक्यता अधिक गुंतागुंतीची बनते.

